मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**वादी नंदु राजाराम जाधव यांचा उलटतपास वादी तर्फे वकील श्री. बी. एस. पोखरकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

७. माझे वडील राजाराम जाधव व प्रतिवादी क्र. १ यांचे वडील राजाराम जाधव या दोन्ही एकच व्यक्ती आहे. राजाराम जाधव यांचे पुर्ण नाव राजाराम नारायण जाधव असे आहे. दावा हा मी माझ्या वकीलांना माहिती दिल्याप्रमाणे तयार केला आहे. वादी व प्रतिवादींची नावे व पत्ते मीच सांगितली. माझे वडील राजाराम जाधव व प्रतिवादी क्र.२ यांच्या नावापुढे असलेले राजाराम जाधव या दोन्ही एकच व्यक्ती आहे. माझी जन्मतारीख २०/०८/१९७३ आहे. प्रतिवादी क्र.१ हा माझ्यापेक्षा लहान आहे किंवा मोठा हे मला सांगता येणार नाही.

८. शकुंतला जाधव ही माझी आई आहे. माझ्या आईचे लग्न राजाराम जाधव यांच्यासोबत सन १९६९ साली झाले. सदर लग्नाची नोंद केलेली नाही. मला एक भाऊ जय राजाराम जाधव व एक बहिण शिला राजाराम जाधव होती. माझा भाऊ व बहिण वारले असुन त्यांचे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. माझी आई शकुंतला व माझे वडील राजाराम असल्याबाबत कागदपत्र दाखल करण्यास मी तयार आहे. मी प्रतिवादी क्र.१ याला ओळखत नाही. जेव्हा ग्रामपंचायत उता-यावर प्रतिवादी क्र.१ चे नाव आले तेव्हापासुन मी त्याला ओळखायला लागलो. राधाबाई नारायण जाधव ही माझी आजी आहे. गाव मौजे धामणी येथील घर मिळकत हे आमचे वडीलोपार्जित घर आहे. माझे आजोबा पुर्वीच चीरा बाजार व्ही.टी. मुंबई येथे राहण्यास गेले. माझ्या वडीलांचा जन्म धामणी येथे झाला. माझे वडील मुंबईला कधी गेले हे मला सांगता येणार नाही. माझा जन्म झाला तेव्हा माझे वडील मुंबई येथे होते. माझी आजी राधाबाई हिचे निधन गावी झाले. माझ्या आजोबांचे निधन मुंबई येथे झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजी, आजोबा व प्रतिवादी क्र.१ हे गावी राहत होते.

९. माझ्या आजीने प्रतिवादी क्र.१ ला धामणी येथील शाळेत घातले होते तसा दाखल देखील उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ अशोक हा

माझा ओळखीचा नाही तरीदेखील त्याला माझ्या मिळकतीबाबत कशी माहिती मिळाली हे मला माहिती नाही. धामणी येथील घर मिळकतीच्या ग्रामपंचायत उता-यावर माझे, माझ्या चुलत भावाचे व प्रतिवादी क्र.१ चे नाव आहे. प्रतिवादी क्र.१ चे नाव घर मिळकतीच्या ग्रामपंचायत उता-यावर आहे हे मला सन २००७ मध्ये कळाले. सदर नाव कमी करण्यासाठी मी ग्रामपंचायतकडे अर्ज केला. मी सदर नाव रद्द होण्याकरीता पंचायत समिती किंवा जिल्हा परीषद यांच्याकडे अर्ज केला नाही. प्रतिवादी क्र.१ हा सण वाराला धामणी येथे येतो किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. मी सणा वाराला धामणी येथे येतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हे धामणी येथे आल्यानंतर दावा मिळकतीमधील घरामध्ये राहतो. प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीचा कर हा ग्रामपंचायतीला पुर्वी भरला आहे.

१०. मी सन २०१२ मध्ये सिटी सर्वे नं.३३१ ला माझ्या नावाची नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र तयार करुन सिटी सर्वे नं.३३१ ला माझ्या नावाची नोंद केली व जाणीवपुर्वक प्रतिवादी क्र.१ चे नाव लावण्याचे टाळले. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंद करतांना मी अशोकला विचारले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांचा जन्म दि.२५/१२/१९६७ साली कामा हॉस्पिटल, आझाद मैदार समोर, व्ही.टी. मुंबई येथे झाला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी प्रतिवादी क्र.१ चे नाव अशोक राजाराम जाधव असे नोंदविले गेले. प्रतिवादी क्र.१ याला धामणी येथील शाळेत घातल्यानंतर त्याचे नाव अशोक राजाराम जाधव असे नोंदविले किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ याला मुंबई येथे विक्रोळी, पार्क साईट शाळा नं.२, मुंबई ७९ या शाळेमध्ये घातल्यानंतर त्याचे नाव अशोक राजाराम जाधव असे माझी चुलती शालीनी प्रकाश जाधव हिने नोंदविले. हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझ्या चुलतीचे संबंध चांगले होते.

११. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ चे पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, वाहन चालक परवाना, एम्प्लॉयमेंट कार्ड, रेशन कार्ड ही सर्व कागदपत्रे अशोक राजाराम जाधव या नावाने आहे. राजाराम व सखुबाई यांचा घटस्फोट झाला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्या दोघांचे लग्नच झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हा सखुबाईचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजाराम व सखुबाई यांचे लग्न झाले होते त्यांचा घटस्फोट झालेला नव्हता तरीदेखील शकुंतला ही राजारामसोबत तशीच राहु लागली. हे म्हणणे खरे नाही

की, सखुबाईला शकुंतलासोबत राहु वाटत नसल्याने राजारामने सखुबाई व प्रतिवादी क्र.१ यांना घराबाहेर काढले. हे म्हणणे खरे नाही की, सदर कारणामुळे प्रतिवादी क्र.१ हा राधाबाई सोबत राहु लागला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा राजारामचा कायदेशीर मुलगा आहे, याउलट मी राजारामचा कायदेशीर मुलगा नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ने मला वकील श्री.संदेश डी. जाधव, विक्रोळी, मुंबई यांच्यामार्फत वाटपाकरीता नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याला मिळकतीमधुन बाजुला काढून एकट्याने सर्व मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.१६/०३/ २०२६**
**घोडेगाव**